**राज्यातील जिल्हा परिषदांतर्गत आरोग्य विभागामध्ये कार्यरत असलेल्या व सेवानिवृत्त झालेल्या बंधपत्रित आरोग्य सेविकांच्या नियुक्त्या नियमित करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

**ग्राम विकास विभाग**

**शासन निर्णय क्रमांकः-डिईएन-२०२५/प्र.क्र.५६/आस्था-१२**

बांधकाम भवन, तळमजला २५, मर्झबान पथ,

फोर्ट, मुंबई-४००००१

दिनांक : ०५ जानेवारी, २०२६

वाचा :- १) ग्राम विकास विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण-२००८/प्र.क्र.१९९/आस्था-८, दि.२ मे, २००९

२) ग्राम विकास विभाग, शासन निर्णय क्र. डीईएन-२०१८/प्र.क्र.३९/आस्था-१२, दि.५ मे, २०१८

३) ग्राम विकास विभाग, शुध्दीपत्रक क्र. डीईएन-२०१८/प्र.क्र.३९/आस्था-१२, दि.२८ मे, २०१९

**प्रस्तावना :-**

जिल्हा परिषदांतर्गत आरोग्य सेवक (महिला) यांची पदे ही सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अखत्यारित असलेल्या संचालक, आरोग्य सेवा संचालनालयामार्फत प्राप्त झालेल्या वाटप यादींनुसार शासकीय परिचर्या महाविद्यालयातून प्रशिक्षण पुर्ण झालेल्या प्रशिक्षणार्थींमधून नियमानुसार २ वर्षाच्या बंधपत्रित कालावधीसाठी भरण्यात येत असत. सदर २ वर्षांचा कालावधी संपल्यानंतर या उमेदवारांना कार्यमुक्त केले जात असे. त्यानंतर संबंधित जिल्ह्यातील रुग्णसेवेची निकड व जिल्ह्यातील रिक्त पदांची स्थिती लक्षात घेता बंधपत्रित ए. एन. एम. यांना ११ महिन्याची अस्थायी नेमणूक/नियुक्ती दिली जात होती. त्यांचा बंधपत्रित कालावधी समाप्त करुन त्यांच्या सेवा त्याच मंजूर व रिक्त पदांवर नियमित करण्यात येत असत. याबाबतचे अधिकार शासन निर्णय दि. ०२ मे २००९ अन्वये विभागीय आयुक्त यांना होते. त्यानुसार सन २०१८ पर्यंत बंधपत्रित आरोग्य सेविकांच्या सेवा नियमित करण्यात येत होत्या. दि. २ मे, २००९ चा ग्रामविकास विभागाचा शासन निर्णय दि. ५ मे, २०१८ (शुध्दीपत्रक दि.२८ मे, २०१९) अन्वये अधिक्रमित करण्यात आलेला आहे.

त्यामुळे सद्य:स्थितीत जिल्हा परिषदेतील बंधपत्रित आरोग्य सेविका (ए.एन.एम.) यांच्या सेवा नियमित करण्याच्या अनुषंगाने कार्यवाही करता येत नाही. तथापि, अद्यापही सेवानिवृत्त झालेल्या व

कार्यरत असलेल्या २९१ बंधपत्रित आरोग्य सेविका यांच्या सेवा नियमित करण्याकरिता शासन निर्णय दि. ०५ मे, २०१८ व शुध्दीपत्रक दि. २८ मे, २०१९ अधिक्रमित करुन मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांना अधिकार प्रदान करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. या अनुषंगाने खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

**शासन निर्णयः-**

राज्यातील जिल्हा परिषदेअंतर्गत आरोग्य विभागात दि. १५ एप्रिल २०१५ पुर्वी नियुक्त झालेल्या व सद्य:स्थितीत सेवानिवृत्त झालेल्या व कार्यरत असलेल्या (परिशिष्ट अ) २९१ बंधपत्रित आरोग्य सेविका (महिला) (ए.एन.एम.) यांच्या सेवा नियमित करण्याबाबतचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांना प्रदान करण्यात येत आहेत.

सदरचा शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने व त्यांच्या अनौपचारिक संदर्भ क्रं. १४२८, दिनांक- २३.०४.२०२५ नुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०१०५१२३९००१९२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

SUBHASH BABAN INGALE

Digitally signed by SUBHASH BABAN INGALE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=RURAL DEVELOPMENT DEPARTMENT, 2.5.4.20=ff061387998f39ca303c7da669fe0471ca884215afebe7e53ecc009e02aad1ce, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=F0319D46C62F9F6D7DBC200D9693539DF215A28C05D55971515AC3C87DDAA987, cn=SUBHASH BABAN INGALE
Date: 2026.01.05 16:07:27 +05'30'

**(सुभाष इंगळे)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन.**

प्रत,

१) मा. राज्यपाल यांचे सचिव, मलबार हिल, मुंबई.
२) मा. मुख्यमंत्री यांचे अतिरिक्त मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा. उप मुख्यमंत्री (नगरविकास) यांचे अतिरिक्त मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई.
४) मा.उप मुख्यमंत्री (वित्त व नियोजन) यांचे अतिरिक्त मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,मंत्रालय, मुंबई.
५) मा. मंत्री, ग्रामविकास यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
६) मा. राज्यमंत्री, ग्रामविकास यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
७) मा. मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहाय्यक, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय मुंबई.
८) महालेखापाल (लेख व अनुज्ञेयता/लेखा परीक्षण), महाराष्ट्र राज्य १ व २, मुंबई नागपूर

९) प्रबंधक, लोक आयुक्त आणि उप लोक आयुक्त कार्यालय, मुंबई.

१०) विभागीय आयुक्त (कोकण,पुणे,संभाजीनगर,नागपूर).

११) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (ठाणे, पालघर, अहिल्यानगर, सातारा, सांगली, जालना, नांदेड, धाराशिव, लातूर, वर्धा, भंडारा).

१२) संचालक अधिदान व लेखाधिकारी, मुंबई.

१३) संचालक निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.

१४) उप सचिव / सह सचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.

१५) उप सचिव / सह सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.

१६) उप सचिव / सह सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई.

१७) जिल्हा कोषगार अधिकारी (ठाणे, पालघर, अहिल्यानगर, सातारा, सांगली, जालना, नांदेड, धाराशिव, लातूर, वर्धा, भंडारा).

१८) अप्पर आयुक्त (विकास), (कोकण,पुणे,संभाजीनगर,नागपूर), विभागीय आयुक्त यांचे कार्यालय.

१९) निवड नस्ती (कार्यासन आस्था-१२)

## परिशिष्ट - अ

### शासन निर्णय-डिईएन-२०२५/प्र.क्र.५६/आस्था-१२, राज्यातील जिल्हा परिषदेअंतर्गत आरोग्य विभागत दि. १५.०४.२०१५ पुर्वी नियुक्त झालेल्या व सद्य:स्थितीत सेवानिवृत्त झालेल्या व कार्यरत असलेल्या २९१ बंधपत्रित आरोग्य सेविका (महिला) (ए.एन.एम.) यांची यादी

| अ.क्र. | जिल्हा | दि. १५ एप्रिल, २०१५ पूर्वी नियुक्त झालेल्या सध्या कार्यरत असलेल्या बंधपत्रित आरोग्य सेविका (महिला) | दि. १५ एप्रिल, २०१५ पूर्वी नियुक्त झालेल्या व सेवानिवृत्त बंधपत्रित आरोग्य सेविका (महिला) | एकूण |
|---|---|---|---|---|
| १ | ठाणे | ७३ | १६ | ८९ |
| २ | पालघर | ८९ | ०० | ८९ |
| ३ | अहिल्यानगर | ०५ | ०० | ०५ |
| ४ | सातारा | ०६ | ०० | ०६ |
| ५ | सांगली | ३८ | ०० | ३८ |
| ६ | जालना | ०४ | ०० | ०४ |
| ७ | नांदेड | १५ | ०० | १५ |
| ८ | धाराशिव | ०३ | ०० | ०३ |
| ९ | लातूर | २० | ०० | २० |
| १० | वर्धा | ११ | ०० | ११ |
| ११ | भंडारा | ११ | ०० | ११ |
| | | २७५ | १६ | २९१ |

**********************